# मराठीशी जुळलेली नाळ परदेशांतही कायम

## 'एनआरआय'नी जागविला मातृभाषेचा अभिमान; अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता

**सुशांत सांगवे**

यशवंतराव चव्हाण साहित्यनगरी (चिपळूण) : व्यवसायानिमित्ताने वीस- तीस वर्षांपासून मायभूमीपासून दूर राहत असलो, सतत इंग्रजीचा वापर करीत असलो, तरी मराठीशी जुळलेली आमची नाळ आजही कायम आहे. मराठी खरोखरीच अंत:करणाला भिडणारी भाषा आहे, आम्हाला ती कधीही परकी वाटत नाही, अशा शब्दांत 'एनआरआय'नी मातृभाषेचा अभिमान रविवारी (ता. १३) येथे जागविला.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सांगता रविवारी सायंकाळी झाली. तत्पूर्वी सकाळच्या सत्रात झालेल्या 'विदेशांतील




मराठीचा जागर' परिसंवादात अनिल नेने (लंडन), संतोष अंबिके (सिंगापूर), मंदार जोगळेकर (अमेरिका), हसन चौगुले (कतार) हे 'एनआरआय' सहभागी झाले. अस्खलित मराठी भाषेत संवाद साधत त्यांनी परदेशात सुरू असलेल्या मराठीविषयक विविध उपक्रमांची माहितीही दिली. साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होत्या. श्री. चौगुले म्हणाले, ''परदेशातही आम्ही एकमेकांमध्ये मराठीतूनच संवाद साधतो. इंग्रजी भाषेत शिक्षण अनिवार्य असताना कतारमध्ये मातृभाषेच्या प्रेमापोटी मराठी शाळा सुरू केली. तेथील काही इंग्रजी शाळांत मराठी विषय शिकवला जातो.''

श्री. जोगळेकर म्हणाले, ''मातृभाषेवर असलले प्रेम तोडता येत नाही. परदेशात गेल्यावर ते अधिक घट्ट होते, हे आम्ही अनुभवले आहे. मराठीच्या विकासासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग वाढत आहे. या बदलांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहायला हवे.''

श्री. अंबिके म्हणाले, ''परदेशात मराठी भाषेचा जागर सुरू राहण्यासाठी मातृभूमीशी संपर्क, संवाद आणि सहवास असणे महत्त्वाचे आहे.'' नेने म्हणाले, ''मराठी भाषा सतत बदलत आहे. हा बदल साहित्यिकांनी विचारात घ्यावा.''

श्रीकांत बापट यांनी सूत्रसंचालन केले.